औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जांबिया, ता. एटापल्ली, जिल्हा गडचिरोली या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारत बांधकामांच्या रुपये ६,८३,५०,०००/- इतक्या रकमेच्या खर्चास देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक :- प्रशामा २८११/२०१९/प्र.क्र.३८/व्यशि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ जुलै, २०१९

संदर्भ:- १) शासन निर्णय, उच्चव तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक प्रशामा-२०११/(१७१/११) व्यशि-२ अर्थसं, दि. २५.०१.२०१२.
२) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१४/मालमत्ता/ लेप्टंविग/२०१९-२०/प्र.क्र.९९/१३७(अ)दि.३.०५.२०१९.

प्रस्तावना:-

अतिरेकी कारवाईग्रस्त जिल्हयातील युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यातील गडचिरोली व गोंदिया या जिल्हयांमध्ये जांबिया जिल्हा गडचिरोली व पालंदूर जिल्हा गोंदिया येथे गोंदिया येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास व चार कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यास विभागाच्या दिनांक ३०.०६.२०११रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने विभागाच्या दिनांक २५.०१.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जांबिया जिल्हा गडचिरोली या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारत बांधकामाच्या रुपये ६,८३,५०,०००/- (रूपये सहा कोटी,त्र्येंऐशी लाख, पन्नास हजार फक्त) किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या भाग-३ परिशिष्ट बी बांधकामे - इमारती नुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जांबिया जिल्हा गडचिरोली या संस्थेच्या बांधकामावर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही, विभागाच्या दिनांक १३.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जांबिया, ता. एटापल्ली, जिल्हा गडचिरोली ऐवजी जिमलगट्टा ता. अहेरी जिल्हा गडचिरोली येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे विभागाच्या दिनांक २५.०१.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जांबिया, ता. एटापल्ली, जिल्हा गडचिरोली या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारत बांधकामांच्या नमुना नकाशा क्रमांक टी-ईडीयु/५२०८ वर आधारीत रूपये ६,८३,५०,०००/-किंमतीच्या अंदाजपत्रकास दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची बाब विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४, परिच्छेद २६२ अन्वये बांधकामाला दिलेली प्रशासकीय मान्यता किंवा अशा बांधकमाच्या अंदाजपत्रकांना दिलेली तांत्रिक मंजूरी ती दिलेल्या तारखेपासून पाच वर्षाच्या कालावधीनंतर सर्वसाधारणपणे अंमलात राहणार नाही. त्यामुळे दि.२५.०१.२०१२ रोजी प्रदान केलेली प्रशासकीय मान्यता आपोआप व्यपगत होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या अभिप्रायास अनुसरून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जांबिया, ता. एटापल्ली, जिल्हा गडचिरोली या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारत बांधकामांच्या रूपये ६,८३,५०,०००/- विभागाच्या दिनांक २५.०१.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेले प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०७२४१७४९४४८८०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f74 4e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500 fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2019.07.24 17:54:52 +05'30'

(संतोष वि. रोकडे)

अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रत,

१. संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई.
३. मुख्याध्यापक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जांबिया, ता. एटापल्ली, जिल्हा गडचिरोली.
४. प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,पालांदुर/जिमलगट्टा.
५. मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,गडचिरोली.
   कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,गडचिरोली विभाग
६. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,गोंदिया/गडचिरोली.
७. निवड नस्ती,व्यशि-२.